जा.क्र.का.15/अधिप्रमाणित प्रत//परिपत्रक/ 580
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे-1
दि.13 /06/2016.

**परिपत्रक :-**

विषय :- वार्षिक मूल्य दर तक्त्याची अधिप्रमाणित प्रत /
प्रत नागरिकांना उपलब्ध करुन देणेबाबत.

चालू वर्षाची अथवा यापूर्वीच्या वर्षातील वार्षिक मूल्य दर तक्त्याची अधिप्रमाणित प्रत / प्रत मिळणेबाबत थेट नोंदणी महानिरिक्षक यांचेकडे अर्ज प्राप्त होत आहेत. वास्तविक वार्षिक मूल्य दर तक्त्याची प्रत उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही दुय्यम निबंधक कार्यालय स्तरावर होणे आवश्यक आहे. जेणेकरुन नागरीकांना त्यांचे कार्यक्षेत्रात आवश्यक कागदपत्र उपलब्ध होऊ शकतील. दुय्यम निबंधक यांनी ते नाकारल्यास वरिष्ठ कार्यालयाकडे विनाकारण पत्रव्यवहार केला जातो. सबब नागरीकांनी वार्षिक मूल्य दर तक्त्याची अधिप्रमाणित प्रत / प्रत मिळणेबाबत मागणी केल्यास, सर्व संबंधित दुय्यम निबंधकांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील वार्षिक मूल्य दर तक्त्याची सदर प्रत उपलब्ध करुन द्यावी.

सदर परिपत्रकाची प्रत नोंदणी व मुद्रांक विभागाच्या www.igrmaharshtra.gov.in या संकेतस्थळावर publication या सदराखाली circulars या ठिकाणी उपलब्ध आहे.

सही/-
( डॉ.रामास्वामी एन.)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत माहितीसाठी सादर :-

1) मा.प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
2) मा.सचिव, (मदत व पुनर्वसन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-32.
3) मा.महालेखापाल (लेखापरिक्षा) - II, महाराष्ट्र, नागपूर.

प्रत माहिती व कार्यवाहीसाठी :-

4) सहनोंदणी महानिरीक्षक, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.
5) सहायक संचालक नगर रचना, मूल्यांकन,कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर
6) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, (मुख्यालय), पुणे.

7) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक (संगणक) पुणे.

-/ सदर परिपत्रकाची प्रत विभागाच्या संकेतस्थळावर upload करणेबाबतची कार्यवाही करणेत यावी.

8) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक कोकण/पुणे/नाशिक/औरंगाबाद/लातूर/अमरावती/ नागपूर यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

-/ सदर परिपत्रकाची प्रत आपले अधिनस्त सर्व नोंदणी कार्यालयांना पुरविणेत यावी. तसेच सदर परिपत्रक त्यांना प्राप्त झाले असून, ते वाचलेबाबत (Read & acknowledge) त्यांच्या कार्यालयाचा अहवाल प्राप्त करुन घेऊन या कार्यालयास पाठविणेत यावा.

9) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरीक्षक कार्यालय, पुणे.

10) श्रीमती.निलीमा देसाई, NIC पुणे.

निर्गमित

नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता